नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४५/२०१७

(श्री. रमेश तुकाराम धुरी व. ५ वि. श्री. गुणाजी सहदेव धुरी व. १६)

## :– नि. ५० खालील आदेश –:

१. वादी क्र. १ याने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

अर्जातील वादीची कथने थोडक्यात पुढीलप्रमाणे–

२. मौजे वाडीवरवडे, ता. कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग येथील श्री देवी भद्रकाली–भराडी तसेच अन्य देवता मिळून श्री. देवी भद्रकाली–भराडी पंचायतन असून सदरचे मंदीराची देवस्थानची सर्व देवकार्ये करण्याचा तसेच उत्पन्न भोगण्याचा वादीच्या घराण्याचा वैयक्तिक हक्क आहे. तसेच फाल्गुन पौर्णिमेपासून पाचव्या दिवसापर्यंत सर्व देवकार्ये करण्याचा वादी घराण्याचा हक्क आहे. वादी क्र. १ ते ३ यांचे वडीलांनी सदर देवस्थानची देवकार्ये करण्याचा त्यांना वैयक्तिक हक्क आहे अशी हक्कप्रस्थापना होवून त्यामधील प्रतिवादींना कायमची ताकदी होण्याकरीता रे. दि. मु. क्र. ५९/१९६० दाखल केला होता व तो दावा मंजुर करण्यात आलेला होता. तसेच त्या दाव्याच्या न्यायनिर्णयावर दाखल केलेले रे. दि. अपील नं. २/१९९३ मध्ये सदरचा न्यायनिर्णय कायम करण्यात आलेला होता. सदर अपीलाच्या निकालात प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी वादी यांना कोणत्याही प्रकारे हरकत करु नये अशी ताकीद या अगोदरच दिली असल्या कारणाने त्यांना देवस्थानमध्ये सामील होता येणार नाही. तरीही प्रतिवादी क्र. १ ते १२, व १४ ते १६ हे जबरदस्तीने सदर देवस्थानच्या कार्यक्रमात सामील होण्याचा प्रयत्न करत आहेत व वादी उपभोगीत असलेल्या मानपानास तसेच देवकार्यास हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच वादीविरुध्द खोट्या व

खोडसाळ तक्रारी दाखल करुन देवस्थानातील शांतता भंग करण्याचा व रितीरिवाजाप्रमाणे चालत आलले कामकाजास अडथळा करीत आहेत. प्रतिवादींची असे कृत्ये चालु राहिल्यास गांवाची शांतता भंग होणार आहे.

३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, कुडाळ पोलिसांनी वादी व प्रतिवादी यांचेकडून दिनांक ३०/१०/२०२० रोजी, दिनांक ३१/१०/२०२० ते दिनांक ०२/१२/२०२० पर्यंतचे कार्यक्रम करणार नाही असा जबाब लिहून घेतला आहे. त्यामध्ये 'दिनांक ३१/१०/२०२० ते दिनांक ०२/१२/२०२० या काळात होणारे जागर, एकादशी, त्रीपुरारी पौर्णिमा, जत्रोत्सव असे धार्मीक कार्यक्रम आम्ही कुळकर, मानकरी तसेच आमचे हस्तक अगर नातेवाईक करणार नाहीत' असे लिहून दिलेले आहे. त्यानंतर दिनांक २३/११/२०२० रोजी महाराष्ट्र सरकारने सदर बंदी उठविली व मंदिरे खुली केली. परंतु मध्यंतरीच्या कालावधीत कुडाळ पोलिसांनी सदर जबाब लिहून घेतला व तहसीलदार यांनी देवस्थानचे कार्यक्रम करण्यास कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे बंदी घातलेली आहे. परंतु दिनांक २३/११/२०२० रोजी प्रत्येक ठिकाणची मंदिरे खुली केलेली आहेत. मे. तहसीलदार यांनी दिलेला आदेश बेकायदेशीर आहे. महाराष्ट्र सरकारच्या नियमावलीप्रमाणे वादीने जबाब दिला होता. परंतु आता नियम बदलले असल्यामुळे वादी कोरोनाचे सर्व नियम व अटी पाळून दिनांक ०१/१२/२०२० रोजीची जत्रा करण्यास तयार आहे. त्यामुळे वादी यांनी दिनांक ०१/१२/२०२० रोजी होणा-या वार्षिक जत्रोत्सवात प्रतिवादी नं. १ ते १२ व १४ ते १६ यांनी वादी यांना देवकार्य करण्यास, मतमान (मानपान), उत्पन्न वगैरे उपभोगण्यास हरकत अडथळा करु नये अशी त्यांच्याविरुध्द तुर्तातुर्त ताकीद होणेकरीता वादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र. ६, ८ व १५ यांनी नि. ५५ कडे सदर अर्जास लेखी म्हणणे दाखल करुन वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नाकारला आहे. त्यांचे म्हणणे की, दावा विषयक देवस्थान हे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर यांचे अधिपत्याखाली येते आहे. त्यांनी देवस्थानात स्थानिक उपसमिती नेमलेली आहे व प्रतिवादी हे त्या उपसमितीचे पदाधिकारी आहेत. त्या उपसमितीने व थळकर यांनी कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, कुडाळ यांचेकडे फौजदारी/वाडीवरवडे/तक्रारी अर्ज/१०/२०२० चा केलला होता. त्यामध्ये वादी, प्रतिवादी व उपसमितीचे पदाधिकारी यांचे जबाब झालेले आहेत. त्यात देवस्थान स्थानिक सल्लागार उपसमितीने मंदिरामध्ये घडलेली घटना म्हणजेच श्री भराडी देवी पाषाण हे दिनांक ०९/१२/२०१८ रोजी भंग पावल्याचे उपसमितीचे निदर्शनास आल्यानंतर तशी पंचयादी उपसमितीमार्फत घालण्यात आली होती. त्याप्रमाणे उपसमितीने श्री देवी भराडीच्या पाषाणाची पुनःप्रतिष्ठापना करण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केले. त्याचप्रमाणे गांव मौजे वाडीवरवडे येथील सर्व ग्रामस्थांनी वाडीवार मिटींग घेवून त्याबाबत मानकरी कुळकर व थळकर यांचेमध्ये एकमत न झाल्याने तशी प्रतिष्ठापना करण्यात आली नव्हती व आता दिनांक २९/०३/२०२० रोजी सदर भराडी देवीचे मुख्य पाषाण अज्ञात व्यक्तीने जागेवरुन हलवले हे उपसमितीच्या निदर्शनास आल्यानंतर उपसमिती व सरपंच, वाडीवरवडे यांनी एकत्रात ग्रामस्थांची मिटींग घेवून याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यावेळी मिटींगमध्ये गाभा–यात लोखंडी दरवाजा व लोखंडी कुलुप लावण्याचे ठरले त्यावेळी त्यास रमेश तुकाराम धुरी व त्याचे कुटुंबियानी विरोध केला. त्यानंतर त्यास लोखंडी दरवाजा व कुलूप लावण्यात आले व पाषाण सफेद रंगाच्या कापडाने झाकण्यात आले. त्यानंतर काही दिवसांनी अज्ञात व्यक्तींनी सदर पाषाणावरील सफेद

कापड काढले व लोखंडी दरवाजाची व कुलुपाची तोडफोड केली. तसेच उपसमितीचे बॅनर फाडून टाकले. त्याबाबत उपसमितीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

५. प्रतिवादींचे पुढे असे म्हणणे की, जरी महाराष्ट्र सरकारने दिनांक २३/११/२०२० रोजी देवस्थानाबाबत बंदी उठवली असली तरी फक्त दर्शनापुरतीचे नियम पाळून परवानगी दिलेली आहे. देवस्थानकडील धार्मिक कार्यक्रम करण्यास अजुनही बंदी आहे व त्याचे उल्लंघन करु नये असा आदेश आहे. सदर आदेश देणारे तहसिलदार यांना पक्षकार केलेले नाही. प्रतिवादी हे थळकर असून ही बाब वादीने लपवून ठेवलेली आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती सदर प्रतिवादींतर्फे करण्यात आलेली आहे.

६. दोन्ही बाजुंच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझेसमोर खालील वादप्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारण मिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०२. | सोयीचे समतोलत्व वादीच्या बाजुने झुकते काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०३. | अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणारे आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :- का र ण मि मां सा -:

७. वादीतर्फे सन्माननिय विधिज्ञ श्री. अे. के. निरवडेकर यांचा युक्तीवाद ऐकला, तर प्रतिवादी क्र. १ ते १२ व १४ ते १६ यांचेतर्फे सन्माननिय विधिज्ञ सौ. हरमलकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**वादप्रश्न क्र. १ ते ३ बाबत-**

८. वादप्रश्न क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्नीत असलेने त्यांचे विवेचन एकत्रात घेतले आहे.

९. तुर्तातुर्त मनाई हुकूम हा एक विवेकाधिकार व समन्वयी दाद आहे. वादीला जर तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळवायचा असेल तर, त्याने तीन तत्वे म्हणजे सकृतदर्शनी केस, सोयीचे समतोलत्व त्याच्या बाजुने आहे. तसेच तुर्तातुर्त मनाई न दिल्यास त्याचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे या बाबी शाबीत करणे आवश्यक ओ, त्याचबरोबर तुर्तातुर्त मनाईचा अनुतोष हा समन्यायी असल्याने त्याबाबत अनुतोष मागणी करत असताना न्यायालयापासून कोणतीही बाब लपवून न ठेवता वादीने आपली केस स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

१०. वादींने रे. दि. मु. क्र. ५९/१९६० कामी झालेला न्यायनिर्णय आणि त्या न्यायनिर्णयाविरुध्द मा. जिल्हा न्यायालयात झालेले रे. दि. अपील नं. २/१९६३ च्या कामी झालेला निर्णय यावर आपली संपूर्ण भिस्त ठेवली आहे. वादीच्या वतीने नि. ०६ कडे रे. दि. मु. नं. ५९/१९६० च्या वादपत्राची सहिसुद नक्कल दाखल केली आहे. नि. ०७ कडे रे. दि. मु. नं. ५९/१९६०

च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत आणि नि. ०८ कडे रे. दि. अपील नं. २/१९६३ च्या कामी मा. जिल्हा न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे.

११. प्रतिवादींच्या कथनानुसार वादविषयक देवस्थानचे कुळकर व थळकर असे दोन वेगवेगळे मानकरी आहेत. वादीचा मुळ दावा आणि प्रस्तुतचा अर्ज यांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादी कोणत्या वखलातील आहेत याबाबत उल्लेख केलेला नाही. तथापी प्रतिवादींच्या कथनानुसार वादी कुळकर वखलातील आहेत तर प्रतिवादी थळकर वखलातील आहेत. रे. दि. मु. नं. ५९/१९६० च्या कामी माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्णयाच्या परिच्छेद नं. १० मध्ये असे अभिमत नोंदविले आहे की,

> *"It is an admitted position between the parties that, the sects of Kulkars and Thalkars alone officiated at the suit temple since old times. It is further not disputed that, Kulkars and Thalkars separately perform their duties and enjoy the income and Matmans. It is further admitted by both the sides that, the articles of deity required for the various functions and cloths and ornaments wherein possession of Kulkars and Thalkars separately.*

१२. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी त्या दाव्यातील नि. ८३ कडील दस्तऐवजाबाबत परिच्छेद नं. १० मध्ये पुढे असेही मत नोंदविले आहे की,

> *'' Exh. 83 is also an old document under the seals of the State. The genuineness of the document is no at all in question. The entry at page no. 3 of this document clearly indicates that, the grand-father of the plaintiff No.1 for the Kulkars and Ganu Laxman Dhuri for the Thalkars were alone held as the officiating priest at the suit temple and they were paid in equal share cash and paddy for the purpose of performing Puja Archa and Nyavaidya. "*

१३. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे निकालपत्रामध्ये नोंदविलेल्या वरील अभिमतावरुन त्या दाव्यातील वादी नं. १ म्हणजे प्रस्तुत दाव्यातील वादींचे वडील तुकाराम कानु धुरी हे कुळकर वखलाचे मानकरी होते तर गणु लक्ष्मण धुरी हा थळकर वखलाचा मानकरी होता.

१४. रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी कुळकरांच्या तीन वखलांपैकी केवळ प्रस्तुत वादींचे वडील तुकाराम कानु धुरी (त्या दाव्यातील वादी नं. १) आणि कृष्णा महादेव धुरी त्या दाव्यातील वादी नं. ३) यांना वादविषयक देवस्थानमध्ये सणाच्या वेळी सर्व प्रकारचे कार्य करण्याचे व मतमान, मानपान

उपभोगण्याचे, देणग्या स्वीकारण्याचे हक्क आहेत असे ठरविण्यात आले आहे. रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी झालेल्या न्यायनिर्णयाविरुध्द त्या दाव्यातील प्रतिवादींनी तत्कालीन मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचेकडे रे. दि. अपील नं. २/१९६३ चे अपील दाखल केले होते. सदरचे अपील नामंजुर करुन रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी दिलेला न्यायनिर्णय कायम ठेवण्यात आला आहे. रे. दि. अपील नं. २/१९६३ च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाविरुध्द पुढे अपील करण्यात आलेले नाही. सबब रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी झालेला न्यायनिर्णय आजही अस्तित्वात आहे. रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी झालेल्या न्यायनिर्णयाचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता तुकाराम कानु धुरी आणि कृष्णा महादेव धुरी यांचे वादविषयक देवस्थानमध्ये असलेल मतमान व मानपान हे केवळ कुळकर घराण्याशी संबंधीत आहेत. सदर देवस्थानमधील थळकर घराण्याला असलेल मानपान, हक्क स्वतंत्र आहेत. थळकर घराण्यातील लोकांचे मानपान, हक्क उपभोगण्याबाबत कोणताही न्यायनिर्णय झालेला दिसत नाही. एकंदरीत वादीचे वडील तुकाराम कानु धुरी आणि कृष्णा महादेव धुरी यांना श्री देवी भद्रकाली भराडी देवस्थानातील कुळकर घराण्याचे मानकरी म्हणून जाहिर करण्यात आले आहे. त्यांचे पश्चात सदरचे मानपान वादींचेकडे चालत आलेले आहेत. कुळकर घराण्याचे मानपान उपभोगण्याचा हक्क माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी पुराव्याअंती ठरवले असत्याने आणि जिल्हा न्यायालयाने अपीलाच्या कामी कायम केले असल्याने वादींची कुळकर घराण्याचे मतमान व मानपान सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. सबब कुळकर घराण्याच्या मतमान व मानपानाबाबत न्यायाचा तराजु वादींच्या बाजुने अंशतः झुकतो. त्याच बरोबर श्री. देवी भराडी देवीच्या वार्षिक जत्रोत्सवात वादींच्या कुळकर घराण्याचे मानपान उपभोगण्यास

प्रतिवादी हरकत अडथळा करत असल्यास सदर जत्रोत्सवाच्या कारणापुरती तुर्तातुत मनाई देवून वादींचे मानपान सुरक्षित राखणे आवश्यक ठरते. वादींच्या कुळकर घराण्याचे असलेल मानपान सुरक्षित राखण्याबाबत तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब मी वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष ''अंशतः होकारार्थी'' नोंदवित आहेत.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत–</u>**

१५. श्री देवी भराडी देवीच्या वार्षिक जत्रोत्सवामध्ये वादींच्या कुळकर घराण्याला असलेले मानपान उपभोगण्यास प्रतिवादींच्याकडून हरकत अडथळा करु नये याकरीता तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेस वादी पात्र आहेत. तथापी, मार्च २०२० पासून आपल्या देशासह संपूर्ण जगामध्ये कोरोना साथीच्या विषाणुने सर्वत्र थैमान घातले आहे. आपल्या देशात लॉकडाऊन जाहिर करण्यात आला होता. सर्व धार्मिक स्थळे, प्रार्थना स्थळे, मंदिरे बंद करण्यात आली होती. दिनांक १४/११/२०२० रोजीच्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार काही अटी व शर्ती घालून धार्मिक स्थळे, प्रार्थना स्थळे, मंदिरे खुली करण्यास परवानगी दिली आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून दिनांक १४/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयामध्ये कडक अटी व शर्ती घालण्यात आलेल्या आहेत. सबब प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा आदेश म्हणजे या न्यायालयाने पारंपारिक पध्दतीने जत्रोत्सव साजरा करण्यास परवानगी दिली असा होत नाही. सदरचा आदेश केवळ वादी तसेच स्थानिक उपसमिती आणि मौजे वरवडे येथील ग्रामस्थांनी दिनांक १४/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून जत्रोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतल्यास त्याप्रसंगी प्रतिवादींनी वादींच्या कुळकर घराण्याला

असलेल्या मतमान व मानपानास हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातुत मनाईबाबत मर्यादीत आहे. सबब मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी तसेच स्थानिक उपसमिती आणि मौजे वरवडे येथील ग्रामस्थांनी दिनांक १४/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून जत्रोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतल्यास त्याप्रसंगी प्रतिवादी नं. १ ते १२ व १४ ते १६ यांनी अगर त्यांच्यातर्फे अन्य इसमांनी वादींच्या कुळकर घराण्याला असलेल्या मतमान व मानपानास हरकत, अडथळा करु नये अशी त्यांना तुर्तातुत मनाई देण्यात येत आहे.

३. सदरचा आदेश वादींना वार्षिक जत्रोत्सव साजरा करण्यास दिलेली परवानगी नाही.

४. वादींना वार्षिक जत्रोत्सव साजरा करावयाचा झाल्यास शासनाच्या प्राधिकृत अधिकारी यांची उचित परवानगी घेवूनच जत्रोत्सव साजरा करावयाचा आहे.

५. या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावयाचा आहे.

Sadanand Baburao Patil
Digitally signed by Sadanand Baburao Patil
Date: 2020.12.04 10:35:28 +0530

दिनांक– ०१/१२/२०२० (एस्. बी. पाटील)

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

कुडाळ.